## नसते अवघड काही रे

डाव मांडला असा इथे हा
रचतो आहे इमले रे
उधळून गेला सारिपाट तो
बघता बघता आता रे

कधी आपला आप्त सखाही
दुखणे देतो आहे रे
कसे कुणाला सांगायाचे
अवघड झाले कोडे रे

वाटा असती कधी न सोप्या
वाटांवरती काटे रे
त्या काट्यांतून वाट शोधता
नसते अवघड काही रे

पुन्हा एकदा वसंत येईल
नवी पालवी फुटेल रे
पुन्हा एकदा बहर फुलांचा
रंग ऊधळूनी जाईल रे

**नरेंद्र प्रभू**
http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/